अफाट प्रतिभेचा आटलेला झरा



संगीतकार सी. रामचंद्रनं त्याचं वर्णन 'कंपोजर्स कंपोजर' (संगीतकारांचा संगीतकार) असं केल्याचं म्हटलं जातं. सलील चौधरीनं त्याला 'जीनिअस', तर ओ.पी. नय्यरनं 'वली' (संत) असं म्हटल्याचंही सांगितलं जातं. त्याच्या चाली गाताना आपल्यावर विलक्षण दडपण यायचं अशी कबुली खुद्द लता मंगेशकरनं दिल्याचंही प्रसिद्ध झालंय. त्याच्या अनवट रचनांचं कौतुक अनिल विश्वाससारख्या जाणत्या बुजुर्गानं केलंय अन् त्याच्या जहरी टीकेचे घाव सोसूनही नौशादनं त्याचं कर्तृत्व मान्य केलंय...

एवढ्या सगळ्या भारदस्त मंडळींनी ज्याची प्रशंसा केलीय तो श्रेष्ठच असला पाहिजे. दुर्दैवानं, एवढी प्रशंसा वाट्याला आलेला सज्जाद हुसेन कुरेशी अर्थात सज्जाद हा अफाट प्रतिभेचं वरदान लाभूनही प्रत्यक्षात माफक यशाचा धनी होता.

यशापयशाची मोजणी संख्येच्या तागडीत तोलून करणं योग्य नाही हे तर खरंच, पण उत्तुंग यश मिळवण्याची पात्रता अंगी असतांना सज्जादनं संगीत दिलेल्या चित्रपटांची संख्या जेमतेम बारापर्यंत भरते तेव्हा त्याला 'अपयशी' संबोधणं क्रमप्राप्त ठरतं. या अपयशाला त्याचं फुटकं नशीब जबाबदार की त्याचा तोंडाळ स्वभाव कारणीभूत हा वादाचा विषय होऊ शकेल. पण झगमगून जावं असं लख्ख यश या संगीतकाराला कधी लाभलं नाही, हे खरं.

मेंडोलिनसारख्या दुर्लक्षित वाद्यावर प्रभुत्व मिळवून आपल्या बोटांच्या जादूनं शास्त्रीय संगीताच्या बड्या मैफली सज्जादनं थरारून सोडल्याचंही काळानं पाहिलं. मात्र, मेंडोलिनला प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या या कलावंताला ना शास्त्रीय संगीतात नाव मिळालं, ना त्या बळावर चार चित्रपट मिळाले!

मध्य प्रदेशातल्या मंदसौरजवळच्या सीतामहू या खेड्यात १५ जून १९१७ या तारखेला सज्जाद हुसेन कुरेशीचा जन्म झाला. वडील मोहम्मद अमीरखाँ हे पेशानं दर्जी पण संगीतातले दर्दी, सतारीसारख्या तंतुवाद्यांची संथा सज्जादला पित्याकडूनच मिळाली. 'न्यू थिएटर्स' अन् 'सैगल' या दोन गोष्टींनी भारावून जाण्याचा तो काळ होता. याच भारलेल्या वातावरणात अनेक कलासक्त तरुणांची पावलं मुंबईकडे वळली, त्यात सज्जाद हाही एक होता. सदतीस साली मुंबईत पाय ठेवलेल्या सज्जादनं काही काळ मिनर्व्हा मूव्हिटोन, वाडिया मूव्हिटोन अशा संस्थांमधून फुटकळ कामं केली. या उमेदवारीनंतर १९४४ मध्ये त्याला 'दोस्त' हा पहिला चित्रपट संगीत दिग्दर्शनासाठी मिळाला. नायिका होती नूरजहाँ. 'खानदान,' 'नादान' सारख्या चित्रपटांमुळे नूरजहाँचं नाव तेव्हा बुलंदीवर पोहोचलेलं होतं. याच नूरजहाँच्या सोनेरी स्वरात 'दोस्त' मधल्या सज्जादच्या चाली बाहेर पडल्या तेव्हा त्या आगळ्या सुरावटींनी जाणते श्रोते चकित झाले. 'कोई प्रेमका देके संदेसा', 'बदनाम मुहब्बत कौन करे', 'मोरे साजना...', 'अब कौन है मेरा' या गाण्यांनी नूरजहाँचे चाहते वेडे झाले. 'बदनाम मुहब्बत...' मधला 'बदनाम' हा शब्द नूरजहाँ असा काही उच्चारायची की रसिक घायाळ होऊन जात. 'दोस्त'चा निर्माता होता नूरजहाँचा पती शौकत हुसेन. दुर्दैवानं 'दोस्त'नंतर सज्जादचं त्याच्याशी बिनसलं अन् पुढच्या चित्रपटांपासून सज्जाद वंचित राहिला. 'दोस्त'मधली गाणी नूरजहाँमुळे गाजली, अन्यथा सज्जादच्या संगीताला विचारतो कोण', असं शौकत हुसेन चारचौघात बोलला. त्यावरून सज्जाद बिथरला अन् त्यापुढे नूरजहाँचा एकही चित्रपट न स्वीकारण्याची शपथ त्यानं घेतली. नवऱ्याच्या चुकीबद्दल स्वतः नूरजहाँनं सज्जादची रदबदली केली. पण त्यानं हट्ट सोडला नाही. त्यानंतर शौकत हुसेनचे 'जुगनू,' 'झीनत' हे चित्रपट सज्जादच्या हातून गेले. 'दोस्त'नंतर दोन वर्षांनी सुरैय्या या आणखी एका गायिका अभिनेत्रीचा '१८५७' हा चित्रपट सज्जादला मिळाला. त्यातही त्यानं आपल्या कामगिरीची चुणूक दाखविली. पन्नास साली लता मंगेशकर नामक दिव्य स्वराशी परिचय झाल्यानंतर सज्जादच्या प्रतिभेला खरा वाव मिळाला. या दोघांनी एकत्र केलेला पहिला चित्रपट होता निगार-देव आनंदचा 'खेल'. 'जाते हो तो जाओ हमभी यहाँ वादों के सहारे जी लेंगे' ही त्यातली लताच्या स्वरातली रचना अद्भुत वाटावी अशीच होती. या गीताची चाल, त्यातला वाद्यमेळ हे सारं अनोखं होतं. याच चित्रपटासाठी लतानं गायलेली 'भूल जा ऐ दिल' ही रचनाही त्याच तोडीची. आणखी एक वर्षानंतर आलेल्या 'सैंया'मधल्या गाण्यांनी तर सज्जादचा दबदबा अधिकच वाढला. या चित्रपटातली लताची सहा सोलो गाणी सज्जादच्या कर्तृत्वाची झलक दाखवायला पुरेशी ठरली. मात्र, एक खरं की सज्जादचं संगीत केवळ उच्च अभिरुचीच्या जाणकारांना आनंद देणारं होतं. सर्वसामान्यांना भुरळ पाडणारी ही गाणी नव्हती.

सज्जादच्या कामगिरीचा सर्वोत्कृष्ट आविष्कार म्हणून 'संगदिल'च्या गाण्यांचा उल्लेख करावा लागेल. या चित्रपटाला त्यानं जे संगीत दिलं, त्याला खरोखर तोड नाही. तलतचं 'ऑल टाईम हिट' असलेलं 'ये हवा ये रात ये चाँदनी' हे गाणं सज्जादच्या सांगीतिक कामगिरीचा अजोड नमुना ठरावं. त्या तुलनेत कमी गाजलेलं तलतचंच 'कहाँ हो कहाँ मेरे जीवन सहारे' हे आर्त विरहगीत तर अस्वस्थ करून सोडणारं होतं. सुरुवातीचा पियानोचा भेदक तुकडा अन् 'इंटरल्यूड'मधली व्हायोलिन्सची संथ गाज त्या गाण्याला गूढत्वाचा स्पर्श देऊन गेली. व्हायोलिन्सचा हाच परिणाम लतानं गायलेल्या 'वो तो चले गये' या गाण्यातही तेवढाच परिणामकारक ठरला होता अन् तलत-लता जोडीचं 'दिल में समा गये' हे तर सज्जादच्या रचनाकौशल्याचं आदर्श उदाहरण ठरावं. 'संगदिल' मधलंच 'दर्शन प्यासी आयी दासी' हे गाणं गीता दत्त केवढ्या तन्मयतेनं गाऊन गेली होती. गीता-आशा या दोघींचं 'धरती से दूर' हे गाणं तर एकदा ऐकल्यावर विसरलं जाणं अशक्यच.

'संगदिल'च्या तोडीचा संगीताविष्कार सज्जादला नंतर कधी घडवता आला नाही. 'रुखसाना 'मधली त्याची गाणी वेगळ्या बाजाची असली तरी त्यामुळे सज्जादला नाव मिळू शकलं नाही. जवळजवळ आठ वर्षांच्या खंडानंतर 'रुस्तम सोहराब'मध्ये त्याच्या प्रतिभेचा आविष्कार पुन्हा एकदा घडून आला. लताच्या गानसामर्थ्याची झलक दाखवणारं 'ऐ दिलरुबा...', हिंदी चित्रपटातल्या रूढ कव्वालीपेक्षा कमालीची वेगळी अशी 'हम न भूलेंगे तुम्हे अल्ला कसम' ही कव्वाली अन् सुरैयाचं हुरहूर लावणारं 'ये कैसी अजब दास्ताँ' ही रुस्तम सोहराबमधील गाणी मनाला आनंद देणारी होती.

बत्तीस वर्षांत केवळ बारा चित्रपट ही सज्जादची कामगिरी त्याच्या कारकिर्दीला 'अपयशी' हे विशेषण लावणारीच होती. त्याच्यापेक्षा कमी दर्जाच्या कितीतरी संगीतकारांना डोळे दीपवणारं यश मिळालं. सज्जादच्या अपयशाला त्याचा हेकेखोर, उर्मट अन् शंकेखोर स्वभाव कारणीभूत होता, हे तर खरंच. पण नेहमी नजरेआड केलं जाणारं आणखी एक कारण म्हणजे त्याच्या संगीताला असलेल्या मर्यादा. सज्जादची प्रतिभा बहुमुखी नव्हे तर एकारलेली होती हे सत्य कटू असलं तरी मान्य करावं लागेल. एका मर्यादेनंतर त्याची गाणी एकसुरी वाटू लागतात. त्याच्या अनेक गाण्यातला वाद्यमेळ एकसुरीपणामुळे परिणाम घालवून बसतो. 'जाते हो तो जाओ' (खेल) अन् 'किस्मत मे खुशीका नाम' (सैंया) या दोन गाण्यांच्या चाली सारख्या वाटतात, तर 'ये हवा ये रात' (संगदिल) अन् 'खयालों मे तुम ही' (सैंया) ही गाणी एका साच्यातून काढल्यासारखी भासतात. सुरैयानं गायलेल्या 'गमे आशियाना' (१८५७) चा ठेका लताच्या 'वो तो चले गये' (संगदिल)मध्ये प्रतिबिंबित झालेला आढळतो. लतानं सज्जादसाठी चौदा गाणी गायली. त्यातली तेरा गाणी दुःखी स्वरातली होती. यावरून सज्जादच्या संगीताचा एकसुरीपणा लक्षात यावा. अपार कारुण्य हा तर अनिल विश्वासच्या संगीताचाही स्थायीभाव आहे. पण त्या कारुण्यात मनाला उभारी देण्याची, विशाल बनवण्याची क्षमता आहे. सज्जादच्या गाण्यांनी हा अनुभव क्वचितच दिलाय. आणखी पाचपन्नास चित्रपट या संगीतकारानं केले असते, तर कदाचित त्याच्या संगीतात वैविध्य आलं असतं. जेमतेम दहा-बारा चित्रपटांमधून विविधता कशी मिळणार?

चित्रपट कमी असले तरी सज्जादचं संगीत इतरांपेक्षा सरस आहे, असं म्हणणं निव्वळ ढोंगीपणाचं ठरेल. ही ढोंगीपणा करणारा एक 'अघोरपंथी' वर्ग समाजात असतो. शंभराच्या आसपास चित्रपटांना संगीत देणारे शंकर जयकिशन, सी. रामचंद्र, एस. डी. बर्मन, ओ. पी. नय्यर, नौशाद हे संगीतकार 'लोकानुनय' करणारे अन् केवळ दहा-बारा चित्रपटांना संगीत देणारा सज्जाद तेवढा 'अभिजात', अशी या अघोरपंथीयांची धारणा! सज्जादच्या गाण्यांपेक्षा त्याच्या फटकळपणाचे किस्से संख्येनं अधिक भरले हे त्याचं नव्हे तर संगीतप्रेमींचं दुर्दैव. सज्जादच्या संगीताचं मर्मग्राही विश्लेषण करण्याऐवजी त्याच्या तिखट जिभेचे खरेखोटे किस्से रंगवून सांगणाऱ्या 'शैलीबाज' लेखकांनी या संगीतकाराला त्याच्या खऱ्या चाहत्यांपासून आणखी दूर नेला.

घोर उपेक्षा तर खय्याम, जयदेव यांच्याही वाट्याला आली होती. पण जगाविषयी कटुता, तुच्छता न बाळगता या गुणवंतांनीही सरस संगीत दिलं. यासाठी त्यांना कधी तडजोड पत्करावी लागली नाही. सज्जादला तेही जमलं नाही. त्याची इतरांवरची टीका अन् विनोद बोचरे, रक्तबंबाळ करणारे असत. आपला समकालीन नौशाद याचा त्यानं सतत दुस्वास केला. कारण काय तर म्हणजे नौशादची लायकी नसताना त्याला एवढं यश मिळालं! नौशादचं संगीत न आवडणारे इतरही अनेकजण होते अन् आजही ते आहेत. पण सज्जादचा नौशादद्वेष समजण्यापलीकडचा होता. अन्य संगीतकारांवर अशीच बोचरी टीका करणारा, तलत महमूदला त्याच्या माघारी 'गलत महमूद' असं संबोधून विकृत समाधान मिळवणारा, नूरजहाँ अन् लताखेरीज अन्य गायिकांचा हेटाळणीयुक्त उल्लेख करणारा हा संगीतकार उत्तरोत्तर अनेकांच्या मनातून उतरत गेला. दिवसेंदिवस आणखी खुजा होत गेला. पंचाण्णव सालातल्या ऑगस्ट महिन्यात तो अल्लाघरी गेला तेव्हा त्याच्या गाण्यांपेक्षा हे किस्सेच अधिक चर्चिले गेले.

'रुस्तम सोहराब' या १९६३ सालच्या चित्रपटानंतर सज्जादनं खुशीनं निवृत्ती पत्करली होती, असा अनेकांचा समज असला तरी तो खरा नाही. मुख्य प्रवाहातून बाहेर फेकला गेल्यानंतर सज्जादनं १९७३ साली 'मेरा शिकार' या स्टंटपटाला अन् १९७७ मध्ये 'आखरी सजदा' या मुस्लिम सामाजिक चित्रपटाला संगीत दिलं होतं. हे दोन्ही चित्रपट पडले अन् त्यातलं संगीतही गाजलं नाही. 'संगदिल,' 'रुस्तम सोहराब'च्या तोडीचं संगीत असलेले आणखी दहा चित्रपट जरी सज्जादनं दिले असते तर जगानं त्याला त्याच्या स्वभावासह स्वीकारला असता. पण दुर्दैवानं तसं झालं नाही. डोंगरातून निघालेला निर्मळ पाण्याचा झरा वाहता वाहता मध्येच कुठं तरी लुप्त व्हावा तसं सज्जादच्या प्रतिभेचं झालं. एका अतिशय बुद्धिमान संगीतकाराच्या सृजनशीलतेला त्याच्याच स्वभावातल्या खुजेपणानं नख लावलं, हीच सज्जादची खरी शोकांतिका.

■ सुनील देशपांडे